## चोविस तासात घरफोडीचा लावला तपास

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २१ जुलै :** कल्पना मुर्लीधर गोन्जाडे कुटूंबियांसह बाहेर गावी असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयांनी त्याचे बंद घराचे दरवाज्याचा कुलूप तोडुन आंत प्रवेश करून घरात ठेवलेल्या एकुण ३८ तोळे ६०० ग्राम वजनाचे सोन्याचे दागीने चोरून नेले होते. सर्वकष तपास करून दि.१३ जुलैला अवघ्या ४८ तासाचे आंत गुन्हयातील आरोपी अटक करून आरोपीतांकडुन चोरीस गेलेले संपुर्ण सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात आले होते. मौल्यवान किंमती मालमत्ता गुन्हेगारांकडुन पोलीसांच्या उत्कृष्ठ तपास कार्यपध्दतीने हस्तगत झाल्यावर ती लवकरात लवकर फिर्यादी परत केले.

## नगर परिषद क्षेत्रात मोकाट जनावरांचा सुळसुळाट



**नागभीड, दि. २१ जुलै :** नागभीड नगर परिषद क्षेत्रातून नागपूर चंद्रपूर,गडचिरोली जिल्ह्याकरिता रस्ता वाहतूक होत असल्याने अनेक जनावरे मोकाट कुत्रे रस्त्यात उभे राहून वाहतुकीस अडथळा निर्माण करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे त्याकरिता मोकाट जनावरे कोणाच्या मालकीची आहेत त्याचा शोध घेण्यात यावा तसेच त्यांना ताकीद देण्यात यावी आणि मोकाट जनावराचा बंदोबस्त करावा व शहरात मोकाट कुत्रे रस्त्यात धावत असल्याने अनेक वाहनांना चालविताना तारेवरची कसरत करावी लागत.

# मनपा शाळांमध्ये सीसीटीव्हीमुळे सुरक्षेचे कवच, पालकांमध्ये आनंद

### २४ शाळांमध्ये बसविले २५६ कॅमेरे

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २१ जुलै :** चंद्रपूर महानगरपालिका शाळांमधील बालसुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी महापालिकेने आता शाळांना सीसीटीव्हीचे सुरक्षा कवच दिले असुन २४ शाळांमध्ये एकुण २५६ सीसीटीव्ही कॅमेरे विद्युत विभागामार्फत बसविण्यात आले आहेत.

चंद्रपूर महानगरपालिकेच्या एकुण २६ शाळा आहेत. या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आयुक्त व प्रशासक विपीन पालीवाल यांनी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे निर्माण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आता महापालिकांच्या २६ पैकी २४ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे सुरक्षित



आणि शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने बसविले गेले असुन उर्वरीत २ शाळांमध्ये लवकरच बसविले जाणार आहेत.

बदलापूर येथील शाळेत घडलेल्या प्रकारानंतर शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. तसेच शाळेत सीसीटीव्हींचे जाळे नसल्याचा मुद्दा देखील चर्चेला आला होता. महापालिकेच्या २१ इमारतींमध्ये २४ प्राथमिक आणि २ माध्यमिक अशा एकूण २६ शाळा असून त्याठिकाणी ४३३३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यानुसार आता या विद्यार्थ्यांवर आता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वॉच ठेवला जाणार आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या बाबतीत चुकीच्या घटना घडु नये याकरीता राज्य सरकारने शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे निर्देश दिले होते.त्यानुसार महापालिकेने महत्त्वाची पावले उचलली आहेत व या कॅमेऱ्यांचे नियंत्रण हे शाळेतील मुख्याध्यापकांच्या ताब्यात ठेवले आहे.

### याठिकाणी बसविले गेले आहेत कॅमेरे

शाळांच्या येण्या जाण्याच्या प्रवेशद्वाराजवळच, वर्गखोलीत तसेच शौचालयाच्या परिसरात बाहेरील ठिकाणी, मैदान, वंराडा, पॅसेज, जिन्यावर याशिवाय इतर महत्वांच्या ठिकाणी कॅमेरे बसविले गेले असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले.

# शिवभोजनात आढळला कनीचा भात; सजग नागरिक, जागरूक पत्रकार व दक्ष अधिकारी यांची त्रिसूत्री कारवाई

### कर्तव्यदक्ष पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्याची कारवाई; शिवभोजन केंद्र चालकाला ठोठावला दंड

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २१ जुलै :** शिवभोजन केंद्र, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जेवणासाठी गेलेल्या विवेक चहांदे यांना त्यांच्या ताटात लाल-पिवळसर रंगाचा कन्याचा भात आढळल्याने ते अचंबित झाले. खवचटपणे रंग मिसळलेला हा भात पाहून त्यांना गैरसोयीची जाणीव झाली आणि त्यांनी हा गंभीर प्रकार तात्काळ ब्रह्मपुरी दर्पणचे संपादक राहुल भोयर यांना फोनवरून कळवला.

या घटनेची माहिती मिळताच पत्रकार राहुल भोयर यांनी समाजहिताची भूमिका घेत संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी अमित कांबळे यांच्याशी संपर्क साधला. राहुल भोयर यांच्या सूचनेची गांभीर्याने दखल घेत अमित कांबळे यांनी शिवभोजन केंद्रावर भेट देत पाहणी केली आणि दोषी आढळलेल्या केंद्र चालक मोहबे यांच्यावर ५,००० रुपयांचा दंड ठोठावला.

या घटनेत आणखी एक गंभीर बाजू अशी समोर आली की, जेव्हा विवेक चहांदे यांनी जेवणातील दोष निदर्शनास आणला, त्याच वेळी केंद्र चालकाने त्यांना पोलिसात तक्रार दिल्यास परिणाम भोगावे लागतील, अशा स्वरूपाची धमकी दिली होती. मात्र विवेक चहांदे यांनी सजग नागरिक म्हणून आपली जबाबदारी पार पाडली.

पुरवठा निरीक्षण अधिकारी अमित कांबळे यांनी केवळ याच घटनेतच नव्हे, तर त्यांच्या कार्यकाळात ब्रह्मपुरी तालुक्याच्या ई-केवायसी योजनेत प्रथम क्रमांक मिळवून देण्याचा कार्यपराक्रम केला आहे. अत्यंत मर्यादित संसाधनांतूनही त्यांनी विधवा, अपंग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल यांना प्राधान्याने धान्य मिळवून देण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे.

अनेक ठिकाणी भ्रष्टाचार करून अन्नाचा लाभ अपात्रांना मिळवून देणारे अधिकारी पाहायला मिळतात, पण अमित कांबळे हे लाचलुचपतविरहित, प्रामाणिक, सामाजिक जाण असलेले अधिकारी आहेत. त्यांच्या कारवाईमुळे शिवभोजन केंद्र चालवणाऱ्या उदासीन आणि हलगर्जी व्यवस्थापनाला स्पष्ट संदेश मिळाला आहे की, गरजूंशी गफ्लत करणाऱ्यांना माफ केले जाणार नाही.

राहुल भोयर यांच्या वेळेवर सूचना, विवेक चहांदे यांचे सजग नागरिकत्व आणि अमित कांबळे यांची कार्यकुशलता – या त्रिकुटाच्या सहकार्यामुळे हा प्रकार थोपवून दखलपात्र पाऊल उचलले गेले. समाजाच्या हितासाठी ही कृती अनुकरणीय ठरणारी आहे. जर हाच प्रकार दुर्लक्षिला गेला असता, तर गरजू व सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असते. त्यामुळे सदरहू घटना ब्रह्मपुरीसाठी एक सावधतेचा इशारा ठरली आहे.

# चिमूर क्रांती जिल्हा होणारच - आ. बंटीभाऊ भांगडीया



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. २१ जुलै :** चिमूर क्रांती जिल्हा निर्माण व्हावा म्हणून मागील पाच दशकांपासुनची मागणी आहे. राज्यात नविन जिल्हे निर्मिती होईल तेव्हा चिमूर क्रांती जिल्हा होणारच अशी ग्वाही अभ्यंकर मैदान चिमूर येथे शनिवार ला अभिष्टचिंतन सोहळ्यानिमीत्य मार्गदर्शन करतांना आमदार किर्तिकुमार भांगडीया यांनी उपस्थित जनसमुदायांना दिली.

यावेळी व्यासपिठावर राजुरा चे माजी आमदार संजय धोटे, भाजपा तालुका अध्यक्ष राजु पाटील झाडे, राजु पाटील देवतळे, भाजपा जिल्हा सरा-चिटनिस निलम राचलवार, माजी संचालक महाराष्ट्र राज्य सह संघ मर्या पुणे चे घनश्याम डुकरे, डॉ दिलीप शिवरकर, चिमूर विविध कार्यकारी सह. सोसायटी चे अध्यक्ष प्रशांत चिडे,भिसी - नेरी मंडळ अध्यक्ष मनिष तुम्पलीवार, जेष्ठ नेते गोपाल बलदुवा, भाजयुमो माजी तालुका अध्यक्ष किशोर मुंगले,ओमप्रकाश गणोरकर, संजय गांधी निराधार योजना समिती चे अध्यक्ष संजय नवघडे, गडचांदुर चे भाजपा युवा नेते निलेश ताजने, डॉ शाम हटवादे, मजहर पटेल, अरविंद रेवतकर, ओबीसी नेते एकनाथ थुटे, भाजयुमो तालुका अध्यक्ष बालू पिसे, चिमूर शहर अध्यक्ष बंटी वनकर, भिसी भाजपा शहर अध्यक्ष पंकज गाडीवार, रवी लोहकरे, अतुल पारवे, लिलाधर बन्सोड, निलेश गभणे, मनोहर मुंगले, बापुराव बोम्मेवार, आकाश ढबाले, राजु बानकर, किशोर नेरलवार, आदि मान्यवर उपस्थित होते.

आमदार किर्तिकुमार भांगडीया यांच्या अभिष्टचिंतना सोहळ्यानिमीत्य जि प च्या समाज कल्याण योजनेतुन १४ लाभार्थ्यांना ई रिक्षा वाटप करण्यात आले. चिमूर नगर परिषदेला प्राप्त झालेल्या अग्निशामक गाडी व शव वाहीनी चे लोकार्पण करण्यात आले.

कार्यक्रमाचे दरम्यान कांग्रेस चे माजी जिल्हा सरचिटनिस अरविंद रेवतकर या-नी आमदार किर्तिकुमार भांगडीया यांच्या विकास कामावर प्रेरित होऊन भाजपा मध्ये प्रवेश केला. यावेळी आमदार किर्तिकुमार भांगडीया यांनी रेवतकर यांना भाजपा चा दुपट्टा टाकुन भाजपा मध्ये प्रवेश घेतल्याचे जाहीर केले.

पुढे आमदार किर्तिकुमार भांगडीया म्हणाले की, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत कांग्रेसला सत्तेतुन खाली खेचण्यासाठी चिमूर विधानसभा क्षेत्रातुन सर्वाधिक संचालक निवडून पाठविलेले आहेत. आणि जिल्हा बँकेवर पथ्मच भाजपा ची सत्ता बसनार आहे. आगामी पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर पंचायत व नगर परिषद निवडणुकीत भाजपा ला १०० टक्के विजय मिळवण्यासाठी आपल्याला एकजूटीने कार्य करावे लागेल अशी सुचना उपस्थित पदाधिकारी तथा कार्यकर्त्यांना दिली.

संचालन जयंत गौरकर यांनी केले तर प्रास्ताविक मार्गदर्शन व आभार एकनाथ थुटे यांनी मानले. यावेळी हजा-रो कार्यकर्ते उपस्थित होते.

# घोडाझरी नहर दुरुस्तीच्या नावाखाली पाटबंधारे विभागाचा लाखोंचा खर्च

## ठेकेदार मालामाल - काम मात्र डागडुगी - प्रशासन सुस्त

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. २१ जुलै :** नागभीड तालुक्यातील घोडाझरी तलाव आणि जुन्या काळात इंग्रज सरकारने बांधलेला तलाव आणि नहर शेवटची घटका मोजत असल्याचे दिसून येत आहे.

नागभिड येथील घोडाझरी तलावातून नागभीड , तळोधी, नेरी येथील पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे. मात्र त्या ठिकाणी विंधन विहिरी बांधण्यात आल्या त्याकरिता त्या ठिकाणी विहीर पाणी साचून पुढील शहराकरिता जो पाणी पुरवठा



कूपनलिका तयार आहेत त्यातून लाखो लिटर पाणी वाया जात आहे. तसेच तलावातील गाळ गेल्या कित्येक वर्षांपासून काढला गेला नाही तसेच नहराची दुरुस्ती ही थातुरमातुर करून दरवर्षी लाखो रुपयांची मलमपट्टी करून ठेकेदार आणि पाटबंधारे विभाग कामे दाखवून शासनाची भूलथापा करीत आहेत. नहराचे काम धामणगाव ते कछेपार नहराचे काम थातूर मातुर केले जात आहे तसेच कालव्यातील गाळ उपसा करण्याचे नावाने बोगस बिले काढून शासनाचे तिजोरीची लूट करण्यात येत असल्याची तक्रार तहसीलदार यांचेकडे केली असता त्यावर कोणतीही कारवाई झाली नसल्याचे दिसून येत आहे. किटाली येथील नहरला आधी पायदळ जाता येत होते त्या ठिकाणी आज झाडे उभी असल्याने जाता येत नाही यामुळे नहराचे बाजूची झाडे तोडून घ्यावी अशी मागणी केली आहे याकडे पाटबंधारे विभाग यांनी लक्ष द्यावे तसेच तालुका प्रशासनाने वेळीच कार्यवाही करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते निकेश रामटेके प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

# चंद्रपूरमध्ये ओयोने त्यांच्या ब्रँडचा वापर करून फसवणूक करणाऱ्या १४ हॉटेल्सविरुद्ध पोलिस तक्रार दाखल

**चंद्रपूर, २१ जुलै :** जागतिक हॉस्पिटॅलिटी टेक्नॉलॉजी कंपनी ओयोने चंद्रपूरमधील १४ हॉटेल्सविरुद्ध त्यांच्या ब्रँडचा फसवणूक केल्याबद्दल एफआयआर दाखल करण्यात आली आहे.

पोलिसांनी तक्रार नोंदवून एफआयआरमध्ये नाव असलेल्या हॉटेल्सविरुद्ध तपास सुरू केला असून यात हॉटेल रॉयल इन, हॉटेल ड्रीम स्टे, हॉटेल फ्रेंड्स स्टे, लिओ स्टार हॉटेल, हॉटेल आरआर इन, हॉटेल अशोका लॉजिंग अँड बोर्डिंग, हॉटेल आयके रेसिडेन्सी, हॉटेल ३ स्टार, हॉटेल सेलिब्रिटी, हॉटेल ग्रीन पार्क, हॉटेल ७ डे, हॉटेल सनराइजिव्ह, रायन हॉटेल सेलिब्रेशन आणि हॉटेल फ्लॅगशिप इन या हॉटेल्सचा समावेश आहे.

ओयोच्या टीमने अलीकडेच एक ग्राउंड सर्व्हे केला आणि त्यात ओयो, ओयो रूम्स आणि ओयो टाउनहाऊस सारख्या ब्रँडच्या नावांनी फसवणूक करून चालणारी अनेक हॉटेल्स आढळली. ओयोने या कृतींचा तीव्र निषेध करून म्हटले आहे की अनैतिक कामांसाठी अनेक मालमत्ता त्यांच्या ब्रँडचा आणि लोगोचा गैरवापर करणाऱ्या अनधिकृत संस्था आहेत, ज्यामुळे त्यांच्या प्रतिष्ठेला गंभीर नुकसान होत आहे. अशा फसवणुकीसाठी कंपनीचे शून्य-सहिष्णुता धोरण असून गुन्हेगारांवर कठोर कारवाई केली जाईल याची खात्री करण्यासाठी कायदा अंमलबजावणी संस्थांसोबत जवळून काम करत आहे. या विषयी ओयोचे क्षेत्रीय प्रमुख गगनदीप गुप्ता म्हणाले, 'हा उपक्रम पारदर्शक आणि विश्वासार्ह हॉस्पिटॅलिटी इकोसिस्टम तयार करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतो. 'महाराष्ट्राचे पर्यटन आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्र सर्व पाहुण्यांसाठी सुरक्षित राहील याची खात्री करण्यासाठी आम्ही कायदा अंमलबजावणी संस्थांसोबत जवळून काम करत राहू.'

हे पाऊल ओयोच्या ब्रँड अखंडतेचे रक्षण करण्यासाठी आणि ग्राहकांचा विश्वास मजबूत करण्यासाठी चालू असलेल्या कार्यक्रमाचा एक भाग आहे. कंपनी सार्वजनिक धारणा सुधारण्यासाठी सक्रिय उपाययोजनांची मालिका राबवत असून यात हॉस्पिटॅलिटी उद्योगातील सुरक्षितता आणि सुरक्षेवर पोलिसांसोबत भागीदारीत देशव्यापी चर्चासत्रे आयोजित करणे, अनैतिक क्रियाकलापांना प्रोत्साहन देणाऱ्या हॉटेल्सना कायमचे ब्लॅकलिस्ट करणे आणि हॉटेल भागीदारांना व्यवसाय करताना स्थानिक सांस्कृतिक संवेदनशीलतेचा आदर करण्यास प्रोत्साहित करणे समाविष्ट आहेत.

कायदेशीर भागीदारी आणि ऑपरेशनल अनुपालन सत्यापित करण्यासाठी ओयो हॉटेल्समध्ये नियमित ऑडिट आणि गूढ तपासणी देखील प्रोत्साहन देत आहे. ते भागीदार हॉटेल्स आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांना अनुपालन, पाहुण्यांची सुरक्षा आणि ब्रँड मानके राखण्यासाठी व्यापक प्रशिक्षण देखील प्रदान करते.ओयो त्यांच्या पाहुण्यांना ओयोच्या अधिकृत अ‍ॅप किंवा वेबसाइटद्वारेच खोल्या बुक करण्यास, अधिकृत ओयोच्या सूचना तपासण्यास आणि संशयास्पद मालमत्ता असल्यास कंपनीला त्वरित कळविण्यास प्रोत्साहित करते, जेणेकरून त्यांचा बुकिंग अनुभव सुरक्षित आणि सुरळीत राहील.

# चांदा पब्लिक स्कूलचे संस्थापक संजय श्रीहरी जिवतोडे यांना भावपूर्ण श्रध्दांजली

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २१ जुलै :** सामान्यातील असामान्य व्यक्तीमत्त्व स्व. संजय श्रीहरी जिवतोडे यांच्या पुण्यतिथीच्या निमित्याने दि. २१ जुलैला चांदा पब्लिक स्कूल येथे आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाची सुरूवात संजय जिवतोडे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

यावेळी प्रमुख अतिथी इको-प्रो चे संस्थापक बंडू धोतरे, प्राचार्या आम्रपाली पडोळे, शाळेचे पर्यवेक्षक महेश गौरकार, सर्व समन्वयक व शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी आदरांजली अर्पण केली.

पर्यावरणाचा समतोल विकास



व्हावा या हेतूने इको-प्रो क्लब च्या वतीने संजय जिवतोडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

यामध्ये विद्यार्थी मंत्रिमंडळातील सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. तसेच पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी 'गो ग्रीन' या संकल्पनेवर आधारित रॅलीत सहभागी होऊन घोषवाक्यांद्वारे पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.

या प्रसंगी संजय सरांच्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांनी 'तेरी पनाह में...' हे गीत सादर करून सरांच्या स्मृतिस अभिवादन केले.

प्राचार्या आम्रपाली पडोळे संजय सरांना भावपूर्ण आदरांजली देत म्हणाल्या की, श्री. संजय सर हे उत्कृष्ट संस्थापकासोबतच एक मार्गदर्शक, दूरद्रष्टे शिक्षकतज्ज्ञ आणि सामाजिक कार्य करणारे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या संकल्पनेतून चांदा पब्लिक स्कूलची स्थापना झाली आणि आजही आम्ही त्यांच्या मूल्यांवर वाटचाल करत आहोत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिक्षा निखाडे या विद्यार्थीनिने तर आभार प्रदर्शन कार्यक्रम प्रमुख नदीम खान यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# नकोडा रेती घाटातून रेती उत्खनन, महसुल मंत्र्याची संबंधीत तहसीलदार, ठाणेदार,वनअधिकाऱ्यांना कारणीभूत ठरवूची घोषणा ठरली फुसका बार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २१ जुलै :** वर्धा नदीपात्रामधून चंद्रपूर उपविभागाच्या नकोडा रेती घाटावरून अजूनही रेती उत्खनन सुरू असून याबाबत महसुल विभागाला तक्रार देखील करण्यात आली आहे. महसुल मंत्री चंद्रशेखर बावणकूळे यांनी विधानसभेत दिलेल्या आश्वासनानुसार संबंधीत तहसीलदार,ठाणेदार व वनविभागाच्या अधिकाऱ्याला कारणीभूत ठरवूची घोषणा फुसका बार ठरल्याचे दिसून येत आहे.

मे महिन्यामध्ये घाटधारक अश्विन ठाकूर ज्यांना चंद्रपूर उपविभाग उपविभागामधील दोन रेतीघाट अजयपूर व नकोडा हे त्या-ना उत्खननासाठी लीजवर देण्यात आलेले आहे त्यांना या दोन्ही घाटा



मिळून ८३००४ ब्रास रेती उत्खननाची अधिकृत परवानगी मिळालेली आहे.

मागील जून महिन्यामध्ये अजयपुर रेती घाटामध्ये घाटदारक यांनी वनविभागाच्या परिसरात झाड झुडपे तोडून उत्खनन केल्याब-ाबतच्या तक्रारी महसूल प्रशासनाकडे व वन विभागाकडे करण्यात आलेल्या होत्या त्या अनुषंगाने मनविभाग चिचपल्ली चंद्रपूर यांनी त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केलेली होती.

तहसील विभागाशी असलेल्या आर्थिक साठगाठीमुळे आजही जुलै महिन्यात पाऊस कमी पडत असल्यामुळे याच संधीचा फायदा घेऊन नकोडा रेती घाटावर अजूनही उत्खनन सुरूच आहे त्यामुळे घुग्घूस व परिसरामध्ये कायद्याचे राज्य शिल्लक राहिलेली की आहे की नाही अशी जनमानसात चर्चा होत आहे.

या अवैध उत्खननाबाबत तह-सील प्रशासनाला सुचना देखील देण्यात आली आहे. दिवसाढवळ्या होणाऱ्या उत्खननामुळे नागरिक हैराण आहेत की महसूल विभागाचे गावामध्ये असणारे तलाठी मंडळ अधिकारी यांनी सुद्धा वरिष्ठांना अशा प्रकारचे कृत्य होत असताना माहिती न देणे किंवा माहिती लपवून ठेवणे हे सुद्धा एक संशोधनाचे विषय असून हा सर्व प्रकार महसुली अधिकाऱ्यांना हाताशी धरून राज्याची गौन संपत्ती शासनाचे अधिकारी संगनमताने परस्पर विकत असून यापासून मोठी माया ते जम-वीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

नकोडा घुग्घुस परिसरात होत असलेली रेत तस्करी रेत उत्खनन म्हणजे महसूल मंत्री यांनी राज्याच्या विधिमंडळाला दिलेल्या आपल्या अभिभाषनामध्ये नोंद केलेल्या तक्रा-री संदर्भात कारवाई करण्यासाठी तहसीलदार पोलीस स्टेशन अधिकारी वन विभाग यांना कारणीभूत ठरवून पुढील कारवाई करण्याचे विधिमंडळाला आश्वासन दिले होते त्या आश्वासनाला सुद्धा रेत तस्कर आणि तहसीलदार चंद्रपूर जुमानत नसल्याचे चित्र एकंदरीत दिसून येत आहे.

## गुणवंताचा सत्कार समारंभ २२ जुलैला

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २१ जुलै :** चंद्रपुरातील इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षेत गुणवत्तेसह उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सन्मान सोहळा भाजयुमो व कमल स्पोर्टींग क्लब, चंद्रपूर च्या वतीने दरवर्षी आयोजित केला जातो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दि. २२ जुलै २०२५ रोजी सायं. ०४.०० वाजता, कन्यका मंदिर सभागृह कस्तुरबा रोड, चंद्रपूर येथे आयोजित या गुणगौरव सन्मान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्य-मंत्री हंसराजजी अहीर तसेच प्रमुख अतिथी म्हणून आमदार किशोर जोरगेवार यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

# राजीव रतन रेल्वे उड्डाणपुलाचे कार्य लवकरात लवकर पूर्ण करा !

### काँग्रेसची महारेल अधिकाऱ्याशी बैठकीत मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. २१ जुलै :** राजीव रतन उड्डाणपुलाच्या समस्या संदर्भात काँग्रेस अध्यक्ष राजुरेड्डी यांनी महा-रेलचे उप - महाव्यवस्थापक (DGM) श्रीकांत गौड, सिनियर मॅनेजर प्रशांत लोकांडे यांच्याशी बैठक घेऊन पूल निर्माणातील समस्याची पूर्णपणे माहिती घेतली.



सदर पूल तातडीने निर्माण करण्यास सांगितले. सदर पूल लवकरात लवकर पूर्ण न झाल्यास तीव्र स्वरूपाच्या आंदोलनाचा इशारा ही दिला. चंद्रपूर ते वणी जाणाऱ्या महामार्गांवर घुग्घूस शहरातील राजीव रतन चौकात आर के मदानी कंपनीच्या वतीने रेल्वे उड्डाणपुलाचे निर्माण कार्य गेल्या तीन वर्षांपासून सुरू आहे. या रेल्वे गेटवर दिवसात कमीत - कमी वीस ते पंचवीस वेळा रेल्वेगेट बंद पडतो.

या रेल्वेगेटच्या वाहतूक कोंडीत अनेक गर्भवती महिला व रुग्णाचा जीव गेला आहे.

शहरातील वेकोली अंतर्गत येणाऱ्या अनेक कॉलनीतील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक,नोक-रीदार लोकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्यामुळे नागरिक प्रचंड त्रस्त आहे.

हा एकेरी मार्ग असल्यामुळे या मार्गावर प्रचंड वाहतुकीची कोंडी निर्माण होते कधी - कधी दोन - दोन तर कधी तीन - तीन तास वाहतूक जाम होत असते

या मार्गावर चालणे ही अशक्य आहे. या पुलाच्या नि-र्माणा करीता आजपर्यंत अनेक आंदोलन करण्यात आलेले आहेत.

याप्रसंगी काँग्रेस नेते सैय्यद अनवर, जिल्हा महासचिव अलीम शेख,सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रोशन दंतलवार, तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास गुडला, कपिल गोगला, विजय रेड्डी, अंकुश सपाटे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

